# नियमबाह्य वापरप्रकरणी `बिग बाजार`ला सील

## मनपाची कारवाई

**नांदेड, दि. २१ :** तळमजल्याचा अनाधिकृतपणे वाणिज्य वापर केल्याचा ठपका ठेवून नांदेड वाघाळा शहर मनपाने ट्रेझर बाजार संकुलात तळमजल्यावर असलेल्या `बिग बाजार`व अन्य दुकानांना आज बुधवारी सकाळी नऊच्या दरम्यान सील ठोकून तेथील सर्व व्यवहार बंद केले.

कौठा-वसरणी परिसरात असलेल्या ट्रेझर बाजार या संकुलास मनपाने बांधकाम परवानगी देताना तळमजल्याचा वापर भांडारगृहासाठी (स्टोअर) करण्यास मान्यता दिली होती. परंतु सदरील संकुलाच्या तळमजल्याचा वापर बिग बाजार व अन्य व्यावसायीक दुकानांच्या माध्यमातून वस्तुंच्या खरेदी व विक्रीसाठीच्या वाणिज्यिय कारणासाठी केला जात असल्याचे उघडकीस आले. यासंबंधात ट्रेझर बाजारच्या संचालकांशी गेल्या अनेक दिवसापासून पत्रव्यवहार केला जात होता. परंतु त्यांच्याकडून पुढील प्रक्रियेसाठी समाधानकारक प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे काही दिवसापूर्वी या संकुलाच्या संचालकांना सात दिवसात तळमजल्याचा अनाधिकृत वाणिज्यीय वापर बंद करण्याची नोटीस दि. २ डिसेंबर २०११ रोजी मनपाने बजावली होती. परंतु विहित मुदतीत संबंधितांनी आपला नियमबाह्य वापर बंद केला नाही.

त्यामुळे आयुक्त डॉ. निपुण विनायक यांच्या आदेशावरुन उपआयुक्त (महसूल) विद्या गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली नगररचना विभागाचे सहायक संचालक सु.ल. कामठाणे, नगररचनाकार खुशाल कदम, सिडको क्षेत्रिय कार्यालय क्र. पाचचे क्षेत्रिय अधिकारी गुलाम सादेक, स्वच्छता निरीक्षक वसीम तडवी, किशन वाघमारे, विजय वाघमारे, रणजीत जोंधळे आदींच्या पथकाने आज सकाळी ट्रेझर बाजार येथे तळमजल्यावरील बिग बाजार व अन्य व्यावसायीक दुकानांना सील ठोकले.